जा.क्र.मनपा/आस्था-१/२०२५/५२९
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
दिनांक :- २८ / ०३/२०२५.

**कार्यालयीन आदेश :-**

महानगरपालिकेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेचे कर्तव्य बजावत असताना नागरिक/व्यक्तींनी कामात अडथळा आणणे, अर्वाच्च शब्दाचा वापर करणे, गोंधळ घालणे, मारहाण करणे इ.प्रकारे शासकीय कामात अडथळा निर्माण केल्यास अशा नागरिक/व्यक्तींविरुध्द संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यासाठी प्रत्येक वेळी कार्यालयाची परवानगी आवश्यक असते. त्यामुळे अशी परवानगी मिळण्यास उशीर झाल्यास, प्रकरणाचे गांभीर्य कमी होऊन उशीराने पोलीस स्टेशनशी संपर्क साधल्यास गुन्हा दाखल करण्यास अडचणी येतात.

या बाबींचा विचार करता या आदेशाद्वारे, मी **जी.श्रीकांत, भा.प्र.से.**, आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६९(१) अन्वये, संबंधित विभागप्रमुख यांना वर नमूद केल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या कामात विविध प्रकारे अडथळा निर्माण करणाऱ्या नागरिक/व्यक्तींविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याचे अधिकार प्रदान करीत आहे. तथापि, अशी कार्यवाही केल्यानंतर प्रकरणाचा अहवाल आयुक्तांकडे सादर करावा.

(जी.श्रीकांत)
आयुक्त
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

प्रत :-
१. सर्व विभाग प्रमुख/शाखा प्रमुख
२. आदेश संचिका